## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. १२०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/०३/२०१८

**१) एटीएम खात्यातुन ऑनलाईन पध्दतीने पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिंनाक ०४/०३/२०१८ चे ११.१९ ते ११.४७ वाजता. दरम्यान यातील नमुद आरोपी मोबाईल धारकाने एटीएम ऑफीस मधुन बोलत आहे. असे सांगुन फिर्यादी कडून एटीएम कार्ड चा १६ अंकी क्रमांक, आधार कार्ड व ओटीपी हस्तगत करुन फिर्यादीचे बचत खाते मधुन २३,९९९/–रु. ऑनलाईन पध्दतीने काढुन फसवणुक केल्याने फिर्यादी विनोद दयाराम मेश्राम वय ३२ वर्ष, रा. पिंडकेपार यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२० भादवी. सहकलम ६६ (क) आय टी ॲक्ट. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. सिडाम पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) डाकपाल याने बनावट सही करुन बचत खाते पासबुक मधुन पैसे काढुन अपहार केल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक २०/०७/२०१४ ते दि. २८/०४/२०१६ पर्यत यातील आरोपी याने देव्हाळा/ बु. शाखा डाक घर येथे शाखा डाकपाल म्हणुन कार्यरत असतांनी १) शिवरापुरी मुलतानी २) रेखा एस बोन्द्रे ३) प्रकाश कांबळे यांची बनावट सही करुन त्याचे बचत खाता पासबुक मधुन रक्कम १,५७,१००/–रु. काढुन स्वत: करीता खर्च करुन अपहार केल्याने, फिर्यादी अमुल शामराव भगत वय ३२ वर्ष, रा. श्रीराम नगर विनोबा कुळकरचे घरी किरायाने तुमसर यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम ४०९,४२०,४६५,४६७,४६८,४७१ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोलंकी पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**३) लाचलुचपत विभाग यांची कारवाई. :–**

दिंनाक ०५/०३/२०१८ चे १२.५७ वाजता दरम्यान यातील आरोपी यांनी तक्रारी भिमराव मेश्राम यांना त्यांचा मुलगा शुशांत मेश्राम याचे बी. ए. प्रथम वर्षाच्या पहील्या सत्राच्या परीक्षेमध्ये समाजशास्त्र विषयाचे इंटरनल मध्ये १ गुण मिळाल्याने त्याचे इंटरनेलचे गुण वाढवुन पास करुन देण्याकरीता पडताळणी कार्यवाही वेळी २,०००/–रु. लाचेची मागणी करुन प्रत्यक्ष सापळा कार्यवाही वेळी २,०००/–रु. लाच रक्कम कोणत्याही प्रकारचा प्रतीकार न करता स्विकारल्याने सरतर्फे फिर्यादी पोलीस निरीक्षक योगेश्वर पारधी एसीबी भंडारा याचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ७,१३(१)(डी)१३(२)ला.प्र.का.१९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस निरीक्षक योगेश पारधी पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) स्वत:चे आर्थीक फायदया करीता बॅकेची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिंनाक ०६/०५/२०१३ ते १२/०६/२०१७ पर्यत यातील आरोपी क्र. १ हे शाखा लिपीक असुन त्यांनी आसिफ मजीर शेख याचे नावाचे बचत खाता उघडुन खात्या संबंधी कागदपत्र हेतु पुरस्पर गहाड केले असुन आरोपी क्र. २ व ३ हे तत्कालीन शाखा अधिकारी असुन त्यांनी सदर खात्यावर महिला बचत गटाचे खात्यास शासनाकडुन मिळालेली व बॅकेचे सबसिडी रिजर्व फंडात जमा झालेले अनुदान हे हेतु पुरस्पर महिला बचत गटाचे खात्यावर जमा न करता वरील क्र. चे बचत खात्यावर जमा करुन स्वत:चे आर्थीक फायदया करीता अपहार करुन बॅकेची एकुण १,४८,७००/–रु. ची फसवणुक केल्याने फिर्यादी हेमराज आसाराम राऊत वय ५५ वर्ष, रा. प्लॉट क्र. २१ राधा कृष्ण विहार कॉलोनी खात रोड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४०९,४२०,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलची चोरी . –**

दिंनाक ०५/०३/२०१८ चे ११.३० ते १२.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी दिपक साकु चौधरी वय ३५ वर्ष, रा. विद्या नगर भंडारा यांनी आपली मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ३७०५ काळयारंगाची हिरो होंडा पॅशन प्रो किंमती २०,०००/–रु. ची ही एचडीएफसी बॅक समोर राजगोपालचारी वार्ड भंडारा येथे रोडाचे कडेला ठेवुन बॅक मध्ये कामाकरीता गेले असता व परत काम आटोपुन पाहीले असता मोटा रसायकल ही ठेवलेल्या ठिकाणी मिळुन आली नाही कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन पाहुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) घरातील नगदी पैश्याची चोरी . –**

दिंनाक ०५/०२/२०१८ ते १०/०२/२०१८ चे १५.०० वाजाता. दरम्यान यातील फिर्यादी दर्याव सुर्यभान मेश्राम वय ५० वर्ष, रा. चिखला हा आपले पत्नीसह औषधोपचारा करीता राहते घराचे दरवाजे बंद करुन नागपुर येथे गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने घराचे समोरील दाराचा कुलुप तोडुन आत प्रवेश करुन सुटकेस मधुन २,०००/–रु. चे ६ नोटा, ५००/–रु. च्या १४ नोटा, २००/–रु. च्या ५ नोटा, असा एकुण २०,०००/–रु. नगदी चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**६) मोटार सायकलच्या धडकेत एकाचा मृत्यु –**

दिंनाक ०५/०३/२०१८ चे १३.२० दरम्यान यातील मृतक कुंडलीक सदाशिव मोटघरे वय ५८ वर्ष, रा. राम नगर शुक्रवारी पेठ भंडारा हा स्वप्नदीप मंगल कार्यालयात हरी भाऊ गभणे यांचे मुलीचे लग्न सोहळयाचे कार्यक्रमात आला होता लग्न सोहळा आटोपुन फिर्यादी सोबत गावाला जाण्या करीता सर्वीस रोडने पायी फिर्यादी सोबत लाखनी बस स्थानक येथे जात असता यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मृतकास मागेहुन लाखनी स्वप्नदीप मंगल कार्यालय समोर येथे धडक मारल्याने मृतक च्या डोक्याचे मागील भागास गंभिर जखम होवुन नाकातुन, डावे कानातुन रक्त निघाल्याने व डावे पायाच्या खळयावर, उजवे पायाचे पोटरीला, उजवे पायाचे टोगळयाचे वरचे भागाला मार लागल्याने त्यास औषधोपचारा करीता ग्रामीण रुग्णालय लाखनी येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने फिर्यादी विलास पटवारु साकोरे वय ३८ वर्ष, रा. शुक्रवारी पेठ राजेन्द्र वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आळे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**७) अल्पवीन मुलगा घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद . –**

दिंनाक ०५/०३/२०१८ चे २१.५२ वाजता. दरम्यान यातील फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा वय १६ वर्ष, हा घरी कोणाला काही न सांगता निघुन गेला त्याचा रिश्तेदारीत शोध घेतला असता मिळुन न आल्याने फिर्यादी गोरख महादेव कावळे वय ५५ वर्ष, रा. शुक्रवारी वार्ड पवनी यांचे तोंडी रिपोर्ट व म.शा.परिपत्रक क्र. सीआरटी ९/१२/प्र. ५४ पोल–१३ दिनांक १०/१२/२०१४ अन्वये पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

८) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ०५/०३/२०१८ चे १८.००ते १८.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो हा लाखनी बस स्थानक समोर येथे येणा–या जाणा–या लोकांना व वाहतुकीस अडथळा होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोशि. लांबट यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. हेमके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

९) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक ०५/०३/२०१८ चे १८.०५ वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन ही करचखेडा फाटा येथे नागमोडी स्थितीत चालवितांनी मिळुन आल्याने, त्यास थांबवुन ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिनद्वारे श्वासाचा नमुना घेतला असता त्यात अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. हटवार यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास मपोना. खोब्रागडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

९) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :–

दिनांक ०५/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन वरठी, तुमसर व अडयाळ येथे अवैध दारु अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २३० लिटर हातभट्टी दारू किंमती २८,०००/–रु. तसेच जुगारातुन किंमती ४९२/–रु. असा एकुण २८,४९२/रु. चा माल जप्त करण्यात आला.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०५/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी किंमती ०१ तीन सिटर वाहनाकरीता ८ ईतर वाहनांवरती – ८५ केसेस करण्यात आले आहे.

06.3.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.